# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/11/2023 (मंगळवार) सकाळ

---

## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :— अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील इंडोरामा गेट क्र. ०१ येथे दिनांक ०७/११/२०२३ चे १०.३० वा. ते ११.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— सत्येद्रंसिग जगनाथ प्रसाद वय ४५ वर्ष रा. कटरे हॉउसिंग टाकळघाट याला **आरोपी नामे— अश्विन विठोबाजी भोयर, वय ३५ वर्ष रा. टाकळघाट** हा भेटला व म्हणाला की, तूने माझ्या गाडीच्या जागेवर गाडी का लावली यावरून झगडा भांडण करून आरोपी याने फिर्यादीचे डोक्यावर रॉडने मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि भुजबळ मो. नं.९९२२६०९११९ हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कारवाई

पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावर शीतलवाडी येथे दिनांक ०५/११/२०२३ चे २२.५० वा. ते २३. १० वा. दरम्यान पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफ यांना गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, शीतलवाडी येथे ट्रकच्या साहायाने अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून पोलीस स्टेशन रामटेक येथील स्टाफने घटनास्थळी जावुन नाकाबंदी केली असता **आरोपी क्रमांक १) नामे—शारीक वल्द युसुफ शेख, रा. छोटी मस्जीत चपरासी पुरा जिल्हा अमरावती** हा **आरोपी क्रमांक २) शेख शकील शेख छोटु, रा. रार्फेजरपुरा जिल्हा अमरावती** याच्या सांगण्यानुसार अवैधरित्या विनापरवाना रेतीची वाहतुक करतांना मिळुन आल्याने आरोपींच्या ताब्यातून १४ चक्का ट्रक क्रमांक एम एच.— २७/बी एक्स— ९२९० किंमती २०,००,०००/— रू व अंदाजे १२ ब्रास रेती प्रत्येकी ३०००/— रू प्रमाणे ३६,०००/—रू. असा एकुण २०,३६,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी रामटेक पोलीसांनी, पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९ भांदवि. सहकलम ४८ (८) महाराष्ट्र जमिन महसुल संहिता १९६६ कायदयान्वये गुन्हा नोंद केला असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. श्रीकांत लांजेवार पोस्टे रामटेक मो. क्र. ९७६४१९०५९१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर